(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

Octember-2021

ISSUE No- (CCCXXII) 322

## २१ व्या शतकातील कोरोना महामारीच्या काळात सद्यस्थितीत निर्माण झालेल्या 'समकालीन सामाजिक समस्या'




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**Editor**
Dr. Sanjay Surewad
Head, Dept. Of Soc.
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**The Journal is indexed in:**
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication Amaravati
Website — www.aadharsocial.com Email — aadharsocial@gmail.com.

| | | |
|---|---|---|
| 20 | पुरुष केंद्रित अर्थनीति और भारतीय नारी डॉ. अरविंद अंबादास घोडके | 70 |
| 21 | उपन्यास में चित्रित प्रेम में असफल पुरूष पात्र ( विशेष संदर्भ : आना इस देश- कृष्णा अग्निहोत्री ) शेख अली जाफर | 72 |
| 22 | कोरोणा महामारी आणि भारतीय अर्थव्यवस्था प्रो. डॉ. डी. बी. तांदुळजेकर | 74 |
| 23 | साहित्यातील वृद्धांची समस्या(उपरे : एकांकिका) डॉ. विठ्ठल केदारी | 76 |
| 24 | करोना काळाचा शिक्षणावर झालेला परिणाम डी.एन.रिठे | 78 |
| 25 | समाजिक स्तरीकरण डॉ. साधना लांजेवार | 81 |
| 26 | भारतीय समाजातील वृद्धांच्या समस्या : कारणे व उपाय प्रा. डॉ. टी. आर. फिसफिसे | 84 |
| 27 | आंध जमातीच्या शैक्षणिक समस्या प्रा.डॉ. गितांजली सदाशिवराव मोटे | 90 |
| 28 | संगीत क्षेत्रातील समस्या व आव्हाने प्रा. डॉ. शिवदास विठ्ठलराव शिंदे | 95 |
| 29 | कोरोना काळातील वाढते महिला अत्याचार : एक आढावा डॉ.विलास चव्हाण | 98 |
| 30 | भारताची लोकसंख्या वाढ : एक सामाजिक समस्या सुप्रिया गणपतराव गडलवाड | 101 |
| 31 | आरोग्य प्रा. ततापुरे जे.जी. | 104 |
| 32 | आत्महत्येची समस्या श्रीमती. धुमाळ सीमा काशिनाथराव | 107 |
| 33 | स्त्रीभ्रुण हत्या : एक सामाजिक समस्या प्रा.संजय सुरेवाड | 109 |
| 34 | सामाजिक स्तरीकरण कुमिदिनी जोशी रामचंद्र याडाराम | 112 |
| 35 | हुंडा बळी एक सामाजिक समस्या प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे | 116 |
| 36 | संत रविदासांच्या काळातील धार्मिक स्थिती डॉ. मिलिंद बळीरामजी भगत /नितीन आनंदराव अंडेलकर | 119 |
| 37 | भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि सामाजिक न्याय श्रीकांत दिनकर तांदळे /प्रो. डॉ.डी.आर.तांदळे | 124 |
| 38 | केंद्रीय कार्यशाळा ताडाळी येथील कर्मचा—यांच्या कार्यसमाधानकारकतेचे अध्ययन प्रिया कृपाशंकर निमजे /प्रा. डॉ. फुलचंद वासुदेव निरंजने | 128 |
| 39 | ग्रामीण महाराष्ट्रातील पारंपरिक समाजसंरचनेत दलित व सवर्ण यांच्या संबंधातील सातत्य आणि बदल : एक समाजशास्त्रीय अभ्यास डॉ.नागोराव आर.कांबळे | 131 |
| 40 | कोविड-१९, भारतीय पर्यटना समोरील आव्हाने : एक राजकीय अध्ययन स्वामी विरभद्र गुरप्पा | 137 |
| 41 | स्त्रीभ्रुणहत्या : एक सामाजिक समस्या प्रल्हाद दत्तराव भोपे | 142 |
| 42 | ग्रामीण कथेतून चित्रित होणाऱ्या ग्रामीण समस्या प्रा. दिलीप ज्ञानोबा भिसे | 146 |

# करोना काळाचा शिक्षणावर झालेला परिणाम

डी.एन.रिठे
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई जि. बीड
मो.न. 9420185136

**प्रास्ताविक :**

कोरोना विषाणूचा (covid-19) परिणाम आज संपूर्ण जगावर झाला आहे. जगातील सर्वच देशांना याचा फटका बसला आहे अनेक देशांच्या अर्थव्यवस्था अत्यंत वाईट रीतीने वाटचाल करत आहेत जग हळूहळू जागतिक मंदीच्या दिशेने वाटचाल करत आहे. या विषाणूमुळे, अनेक देशांमध्ये लॉकडाऊन आणि कर्फ्यूची परिस्थिती आहे. या विषाणूमुळे औद्योगिक , सामाजिक-आर्थिक आणि आणखी एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे उच्च शिक्षण प्रभावित झालेले आहे.

प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च शिक्षण असो, करोनामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर वाईट परिणाम झाला आहे. अनेक शाळा, महाविद्यालये, आणि विद्यापीठांनी ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा वापर करून त्यांच्या विद्यार्थ्यांना आधार देण्याचा प्रयत्न केला आहे परंतु अशा संस्था कमी आहेत.आज गरज आहे सरकार, संस्था, समाज, उद्योग, नेते यांनी एकत्र येऊन सर्व विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याची, या कठीण काळात मुलांचे मनोबल वाढवणे, त्यांना सकारात्मकता देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**उदिष्ट्ये :**

- करोना विषाणूचा शिक्षणावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे
- करोना काळात शिक्षणात येणाऱ्याअडचणीचा अभ्यास करणे
- करोना काळातील शिक्षणावरील उपाय योजनाचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधाकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला असून त्यासाठी दुय्यम साधनाचा त्यामध्ये विषयाशी संबधित साहित्य,मासिके, सरकारने दिलेली आकडेवारी,इंटरनेट इत्यादीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

शिक्षण हे एकमेव प्रगतीचेसाधन आहे पण कोरोना ह्या जागतिक संकटामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. आज आपला भारत देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असताना कोरोना विषाणूने ( Covid-19) जगभर महाथैमान घातले आहे. या विषाणूने सर्वच क्षेत्रात मोठ्या अडचणी निर्माण केलेल्या आहेत. कोरोनाच्या संकटासमोर जागतिक बलशाली महासत्ता असलेले राष्ट्र देखील हतबल झालेली आपल्याला दिसत आहेत. या कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी २२ मार्च २०२० पासून काही कालावधी साठी संपूर्ण देशात लॉकडाऊन करण्यात आला. शाळा, महाविद्यालये यांना सुट्टी देण्यात आली. दरम्यानच्या काळात कोरोणामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात व्यत्यय किंवा अडथळा येऊ नये विद्यार्थी हा शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहू नये, म्हणून ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग निवडण्यात आला. ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारी सर्व साधने शहरातील किंवा श्रीमंत शिक्षीत पालकांच्या मुलांकडे होती किंवा आहेत. परंतु ग्रामीण भागातील गरीब शेतकरी कष्टकरी अशिक्षित पालकांच्या मुलांचे काय.गेल्या एक ते दिड वर्षांपासून शाळा व महाविद्यालय बंद आहेत परंतु शाळेतील विद्यार्थी असो की महाविद्यालयात उच्च शिक्षण घेणारा युवक विद्यार्थी असो त्यापर्यंत ऑनलाईन शिक्षणाची सोय साधणं आजही नाहीत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी अस्वस्थता निर्माण झालेली आपल्याला दिसत आहे...

या परिस्थितीतून निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे जगभर भितीचे वातावरण आहे. जागतिक व देशाच्या अर्थव्यवस्था लॉकडाऊनमुळे बेरोजगारीच्या विळख्यात अडकल्यामुळे डळमळीत झालेली आहे. ठप्प झालेल्या अर्थव्यवस्थेमुळे हातावर पोट असणाऱ्या कष्टकरी शहराकडून गावाकडे निघाले आहेत कोरोना संकटामुळे अनेक

देशातील शिक्षण संस्था देखील बंद आहेत "युनेस्को" च्या अहवालानुसार एप्रिल२०२० मध्ये १८८ देशात १५४ कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. भारतात १५ लाख शाळा बंद आहेत. त्यामुळे २६ कोटी विद्यार्थी व ८९ लाख शिक्षक घरी बसले आहेत तर उच्च शिक्षणात ५० हजार शिक्षणसंस्था बंद आहेत व ३.७० कोटी विद्यार्थी आणि १५ लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी बसले आहेत. म्हणजे एकूण ३० कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. कोरोनाची समस्या ही केवळ आरोग्याची समस्या आहे असे मानले जाते. पण या संकटाला शैक्षणिक समस्यांची बाजू आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

युनेस्को ने शाळाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांच्या समस्येवर तातडीने मार्ग काढणाच्या सुचना आपल्या सभासद देशांना दिल्या आहेत. शिक्षणात आलेल्या या व्यत्ययाने मुलांना शिक्षण हक्कापासून वंचित राहावे लागत आहे असे मत "युनेस्को" ने नोंदविले आहे. कोरोना काळात शिक्षण बंद न करता त्यासाठी नवे मार्ग शोधण्यासाठी गरज निर्माण झाली आहे म्हणून गरिब विद्यार्थ्यांचे शिक्षण न थांबता पर्यायी मार्ग शोधणे हेच आजच्या काळातील आव्हान व गरज आहे.

दुरशिक्षण माहिती तंत्रज्ञानाचा वापर, यू-ट्यूब, हँगआउट, मल्टिमीडीया ,मोबाईल फोन ई-लायब्ररी, दुरदर्शन इ. माध्यमातून अनेक देशांनी तातडीने मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये म्हणून वरील प्रकाराच्या माध्यमातून शिक्षण देत आहेत. परिस्थितीची अनिश्चितता लक्षात घेतली तर आपल्या देशाने सुद्धा दिर्घ काळासाठी शैक्षणिक धोरण ठरविणे आवश्यक आहे. आपल्या देशात उच्च शिक्षणात व मेडिसिन, इंजिनेअरिंग ,कॉमर्स व मॅनेजमेंट यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमात माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो विद्यार्थी. आर्थिक दुष्ट्या वरच्या स्तरातील असल्यामुळे लॅपटॉप,इंटरनेट इ. खर्च त्यांना परवडतो. त्यामुळे प्रामुख्याने अभिजन वर्गाच्या छोट्या गटांचा अभ्यास ऑनलाईन चालू आहे. समस्या आहे ती मात्र बहुसंख्य कष्टकरी, गरिब वर्गातील मुलांची भटके विमुक्त अदिवासी ग्रामीण भागांतील मुला मुलींची.

माहिती तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचा प्रसार शिक्षणाचा विस्तार, शिक्षणाचा दर्जा, शिक्षणाची संधी वाढविण्यास भरपूर वाव आहे. असे वाटते परंतु "ट्राय" च्या अहवालानुसार भारतात२०२० मध्ये इंटरनेट वापरणार्यांची संख्या६८.४६ कोटी आहे मोबाईल फोन वापरणार्यांची संख्या४८.८२कोटी आहे तर इंटरनेट सह स्मार्ट फोन वापरणार्यांची संख्या४०.७२ कोटी आहे तर T.V पाहणार्यांची संख्या ७६ कोटी इतकी आहे हा माहिती तंत्रज्ञानाचा विस्तार झालेला दिसत असला तरी त्यात प्रचंड प्रमाणात विषमता आहे भारतात ५२% जनता इंटरनेटचा वापर करते म्हणजे निम्मा भारत आजही इंटरनेटच्या लाभापासून वंचित आहे ग्रामीण भागात ३६% जनता व शहरात ६४ % जनता इंटरनेटचा वापर करते तर ६७% पुरुष व ३८% स्त्रिया भारतात इंटरनेटचा वापर करतात. माहिती तंत्रज्ञान हे शहरी, सधनवर्ग व पुरुष यांचीच सध्यातरी मक्तेदारी होत आहे. त्यामुळे "नॅशनल डिजिटल लायब्ररी", "स्वयम ", "शोध गंगा", इ. सरकारी प्रकल्पांचा फायदा मर्यादित होत आहे या प्रकारच्या ऑनलाईन शिक्षणात कम्प्युटरची किंमत, इंटरनेटचा खर्च, विजेचा पुरवठा. इ. प्रमुख अडचणी आहेत. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण ही चैन शहरातील सधनवर्गाला परवडते. मग ऑनलाईन शिक्षण अजिबात नाकारले पाहिजे का? नाही तर यावर सरकारने काम केले पाहिजे ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना कम्प्युटर, इंटरनेटच्या सुविधा मोफत व गतिशील पद्धतीने उपलब्ध करून दिल्या पाहिजेत ऑनलाईन शिक्षण अश्या विद्यार्थ्यासाठी हे खूप फायदेशीर आहे ज्यांना नियमित शिक्षण घेणे कठीण आहे. नवीन प्रकारचे रोजगार मिळवण्यासाठी ऑनलाइन कार्यक्रम त्यांच्यासाठी खूप उपयुक्त ठरतील. विविध पदवी कार्यक्रमांमध्ये पारंपारिक शिक्षण घेत असलेल्या नियमित विद्यार्थ्यांसाठी ॲड-ऑन अभ्यासक्रमांच्या स्वरूपात ऑनलाईन अभ्यासक्रम देखील त्यांचे ज्ञान-कौशल्य वाढवू शकतील. या व्यतिरिक्त, गरीब किंवा दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी ज्यांना फार चांगले शिक्षक किंवा श्रीमंत ग्रंथालये उपलब्ध नाहीत, सर्वोत्तम संस्थांनी तयार केलेले ऑनलाइन अभ्यास साहित्य वरदान ठरेल.

मानव संसाधन विकास मंत्रालयाने विकसित केलेले स्वयम, दीक्षा, ई-बस्ता, नॅशनल रिपोजिटरी ऑफ ओपन एज्युकेशनल रिसोर्सेस, शोधगंगा, स्कॉलर, ई-पीजी पाठशाळा इत्यादी ई-लर्निंग प्लॅटफॉर्म अतिशय उपयुक्त आहेत. त्यांना वर्गात शिकवण्यासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालयाने तयार केलेले ई-लर्निंग प्लॅटफॉर्म अतिशय उपयुक्त आहे. मानव संसाधन विकास मंत्रालयाने विकसित केलेले स्वयम, दीक्षा, ई-बस्ता, नॅशनल रिपोजिटरी ऑफ ओपन

एज्युकेशनल रिसोर्सेस, शोधगंगा, स्कॉलर, ई-पीजी पाठशाळा इत्यादी ई-लर्निंग प्लॅटफॉर्म अतिशय उपयुक्त आहेत. त्यांना वर्गात शिकवण्याचे सहाय्यक साधन म्हणून स्वीकारणे नि: संशय फायदेशीर ठरेल

**निष्कर्ष :**

कोरोना संकटाच्या काळात ऑनलाईन शिक्षण निश्चितपणे एक गरज आहे, परंतु सामान्य दिवसांमध्ये ते केवळ पारंपारिक वर्ग शिक्षणाला जोड म्हणून उपयोगी पडेल आणि भारताच्या सर्वांगीण विकासासाठी पर्याय म्हणून नाही तर सहाय्यक साधन म्हणून स्वीकारणे नि: संशय फायदेशीर ठरेल.उच्च शिक्षणाचा प्रमुख उद्देश ज्ञान निर्मिती, संशोधन, ज्ञान संपादन आणि त्याचे प्रक्षेपण, हा आहे . महाविद्यालयीन शिक्षणाचा विशेष भर हा विद्यार्थांचा सर्वांगिण विकास आणि त्यांच्यातील विविध क्षमतांची वाढ करणे हा असावा.

**संदर्भ सूची :**


- युनेस्कोचा अहवाल एप्रिल २०२१
- ट्रॉयचा अहवाल २०२१
- इंटरनेट
- वृत्तपत्रे